महाराष्ट्र शासन

क्र.कल्याण-२०१९/प्र.क्र.२०/नापु-२८
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार) मुंबई-४०० ०३२.
ई-मेल- napu२८.mhpds@gov.in
दिनांक : ८, ऑगस्ट,२०१९

प्रति,

१. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई
२. सर्व उपायुक्त (पुरवठा)
३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व जिल्हापुरवठा अधिकारी / सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी

विषय : राज्यातील कल्याणकारी संस्था व वसतीगृह योजनेंतर्गत यांना माहे एप्रिल, २०१९ ते सप्टेंबर, २०१९ नियतन बाबत.

संदर्भ:- १)शासन निर्णय क्रमांक साविव्य-१००२/११३७/प्र.क्र.९७३/ना.पु.२८, दि.२६.०४.२००२
२) केंद्र शासनाचे पत्र क्र.९-५/२०१४-BP-II, दिनांक ५ सप्टेंबर, २०१७
३) केंद्र शासनाचे पत्र क्र. ४-६/२०१८-BP-II (pt.), दिनांक ३० जुलै,२०१९

राज्यातील कल्याणकारी संस्था व वसतीगृहे योजनेंतर्गत माहे एप्रिल, २०१९ ते सप्टेंबर, २०१९ या कालावधीकरिता बी.पी.एल. दराने अन्नधान्याचे मासिक नियतन वितरीत करण्यासाठी केंद्र शासनाने संदर्भाधिन दि.३०.०७.२०१९ च्या पत्रान्वये उपयोगिता प्रमाणपत्रामध्ये जिल्हयांनी कळविलेले शिल्लक नियतन विचारात घेऊन फक्त शासनाच्या मालकीच्या व शासनाकडून चालविण्यात येत असलेल्या संस्थातील १७६०९ लाभार्थ्यांसाठी (९३०० मुलींच्या वसतिगृहातील व ८८३०९ कल्याणकारी संस्थेतील) प्रतिमाह ४९९.४१ MTs गहू, व ४५७.७१ MTs तांदूळ याप्रमाणे उपरोक्त कालावधीसाठी २९९६.४६ MTs गहू व २७४६.२६ MTs तांदूळ इतके नियतन मंजूर केले आहे. त्यानुसार जिल्हानिहाय नियतन सोबतच्या **विवरणपत्र - अ** नुसार वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. **विवरण पत्र - ब** नुसार ठाणे, नांदेड व हिंगोली या जिल्हयामध्ये शासकीय संस्था नसल्याने सदर जिल्हयांना नियतनाचे वाटप करण्यात आलेले नाही. रत्नागिरी, परभणी, यवतमाळ व वर्धा या चार जिल्हयांकडे नियतन शिल्लक असल्याने त्या जिल्हयांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आलेले नाही. नंदूरबार, जळगाव, पूणे ग्रामीण, भंडारा व चंद्रपूर या जिल्हयांकडे आवश्यक असणाऱ्या गव्हापेक्षा अधिक गहू शिल्लक असल्यामुळे या जिल्हांना कल्याणकारी संस्थांच्या योजनेतून गव्हाचे वाटप करण्यात आलेले नाही. अहमदनगर, सातारा व अकोला ३ या जिल्हयांकडे आवश्यकतेपेक्षा जास्त तांदूळ शिल्लक असल्याने या जिल्हयांना तांदळाचे वाटप करण्यात आलेले नाही. केंद्र शासनाने या योजनेंतर्गत राज्याकडे शिल्लक असलेले नियतन विचारात घेउन केवळ उर्वरित नियतन मंजूर केले असल्याने सदर जिल्हयांनी एप्रिल २०१९ ते सप्टेंबर २०१९ या कालावधीसाठी नियतनाचे वितरण त्या जिल्हयांकडे शिल्लक असलेल्या नियतनामधून करावे.

३. उक्त नियतनाची उचल व वाटप या संदर्भात केंद्र शासनाच्या दिनांक ३० जुलै २०१९ च्या पत्रातील सूचनांनुसार कार्यवाही करावे. सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे. विवरणपत्र-अ मध्ये पात्र लाभार्थ्यानुसार मासिक तसेच सहा महिन्यांसाठी वितरित करावयाचे नियतन स्तंभ क्र. ८ ते क्र. १३ मध्ये दर्शविण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्याने भारतीय अन्न महामंडळाकडून विवरणपत्रातील स्तंभ क्र ११ ते १३ मध्ये दर्शविण्यात आलेल्या आकडेवारीनुसार (नियतनानुसार) मासिक अन्नधान्याची उचल करावी. राज्य शासनाने भारतीय अन्न महामंडळाकडून सदर अन्नधान्याची उचल बी.पी.एल. दराने करावयाची आहे असे केंद्र शासनाने कळविले आहे. सबब भारतीय अन्न महामंडळाच्या नजिकच्या क्षेत्रिय कार्यालयाशी संपर्क साधून विहित मुदतीतच अन्नधान्याची रक्कम भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करुन मासिक नियतनानुसार अन्नधान्याची उचल पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

४. एप्रिल २०१९ ते ऑगस्ट २०१९ या कालावधीकरिता वाटप करण्यात आलेल्या नियतनाची रक्कम जमा करण्याकरिता व उचल करण्याकरिता केंद्र शासनाच्या नियतन मंजुरीच्या पत्राच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक ३० जुलै, २०१९ पासून ३० दिवसांची मुदत देण्यात आलेली आहे. तसेच माहे सप्टेंबर २०१९ साठी नियतनाची उचल मागील महिन्यात अन्नधान्याची उचल करण्यात आलेल्या दिनांकापासून एक महिना पूर्ण होत असलेल्या शेवटच्या दिनांकापर्यंत करण्यात यावी व अन्नधान्याची आगाऊ रक्कम एफसीआय कडे जमा करण्यात यावी. एप्रिल, २०१९ ते सप्टेंबर २०१९ या सहामाही कालावधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासकिय संस्थांना अन्नधान्याचे वितरण केल्यानंतर तात्काळ शासनास सादर करण्यात यावे. अन्नधान्याचे वितरण, उचल व वाटपाच्या संदर्भात केंद्र शासनाच्या दिनांक ५ सप्टेंबर, २०१७ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

५. **कल्याणकारी संस्था व वसतीगृह योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त अन्नधान्याचे वितरण Point of Sale Device (PoS) मशिनद्वारे करण्यात यावे. त्यासाठी आवश्यक त्या प्रशासकीय व तांत्रीक बाबीची पूर्तता करण्याची दक्षता सर्व संबंधीतांनी घ्यावी.**

६. **केंद्र शासनाने कल्याणकारी संस्था व वसतिगृहे या योजनेंतर्गत फक्त शासनाच्या मालकीच्या व शासन चालवित असलेल्या संस्थानाच नियतन वितरित करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.** त्यामुळे जिल्हयांना वितरित करण्यात आलेले नियतन सोबत जोडलेल्या विवरणपत्र-अ मधील कॉलम ३ मध्ये नमूद केलेल्या संख्येएवढया शासकीय संस्थाना वितरित करण्यात यावे. Government aided आणी Private संस्थाना नियतनाचे वितरण करण्यात येऊ नये. अन्नधान्याच्या वितरणासंदर्भात अनियमितता झाल्यास संबधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरूद्ध प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.

(चारूशीला तांबेकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१. महाव्यवस्थापक, भारतीय अन्न महामंडळ, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे मंजूर केलेले नियतन मुक्त (release) करण्याच्या सूचना सर्व जिल्हा प्रबंधक भारतीय अन्न महामंडळ यांना तात्काळ द्याव्यात.

२. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई

३. उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी नियतनानुसार जिल्ह्यांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील महाफुड आज्ञावलीव्दारे प्राप्त करुन घ्यावा.

४. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई तसेच सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर आदेशान्वये केलेले नियतन विचारात घेऊन अन्नधान्याचे वाटप करावे.

( चारुशीला तांबेकर )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१. अवर सचिव (संगणक कक्ष), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत नियतनाचे आदेश विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावेत.

२. निवडनस्ती, नापु-२८.

विवरण - अ

## ALLOCATION FOR WELFARE INSTITUTIONS SCHEME FOR THE PERIOD FROM APRIL 2019 To SEPTEMBER 2019

| SR.NO. | DISTRICTS | NO OF GOVERNMENT INSTITUTIONS | NO OF BENEFICIARIES | QUANTUM PER BENEFICIARY PER MONTH (KG) | | | ACTUAL ALLOCATION FOR 6 MONTH(MT) | | | ACTUAL ALLOCATION FOR 1 MONTH (MT) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | MUMBAI /THANE | 32 | 15014 | 8 | 7 | 15 | 595.5 | 517.082 | 1112.58 | 99.25 | 86.1804 | 185.43 |
| 2 | THANE | 0 | 0 | 9 | 6 | 15 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 3 | PALGHAR | 9 | 900 | 7 | 8 | 15 | 33.996 | 38.424 | 72.42 | 5.666 | 6.404 | 12.07 |
| 4 | RAIGAD | 23 | 6549 | 7.5 | 7.5 | 15 | 241.658 | 241.658 | 483.316 | 40.2764 | 40.2764 | 80.552 |
| 5 | RATNAGIRI | 6 | 632 | 7 | 8 | 15 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 6 | SINDHUDURG | 6 | 280 | 7 | 8 | 15 | 5.573 | 7.442 | 13.0159 | 0.928 | 1.24 | 2.16931 |
| 7 | NASIK | 8 | 3745 | 9 | 6 | 15 | 138.678 | 110.552 | 249.231 | 23.113 | 18.425 | 41.538 |
| 8 | DHULE | 10 | 293 | 9 | 6 | 15 | 12.974 | 8.649 | 21.623 | 2.162 | 1.4415 | 3.603 |
| 9 | NANDURBAR | 16 | 3456 | 9 | 6 | 15 | 0 | 21.51 | 21.51 | 0 | 3.585 | 3.585 |
| 10 | JALGAON | 16 | 1140 | 9 | 6 | 15 | 0 | 33.6528 | 33.6528 | 0 | 5.6088 | 5.6088 |
| 11 | AHMEDNAGAR | 26 | 999 | 9 | 6 | 15 | 17.623 | 0 | 17.623 | 2.937 | 0 | 2.937 |
| 12 | PUNE DSO | 24 | 1746 | 10 | 5 | 15 | 0 | 8.181 | 8.181 | 0 | 1.363 | 1.363 |
| 13 | PUNE FDO | 7 | 7095 | 8 | 7 | 15 | 279.259 | 244.352 | 523.611 | 46.543 | 40.725 | 87.268 |
| 14 | SATARA | 35 | 2442 | 9 | 6 | 15 | 15.52 | 0 | 15.52 | 2.586 | 0 | 2.586 |
| 15 | SANGALI | 65 | 5353 | 9 | 6 | 15 | 237.031 | 115.253 | 352.283 | 39.505 | 19.208 | 58.713 |
| 16 | SOLAPUR DSO | 25 | 1965 | 9 | 6 | 15 | 35.957 | 57.309 | 93.266 | 5.992 | 9.551 | 15.544 |
| 17 | SOLAPUR FDO | 4 | 1248 | 8 | 7 | 15 | 49.121 | 32.821 | 81.942 | 8.186 | 5.47 | 13.657 |
| 18 | KOLHAPUR | 2 | 2060 | 9 | 6 | 15 | 50.216 | 15.776 | 65.992 | 8.369 | 2.629 | 10.998 |
| 19 | AURANGABAD | 5 | 2815 | 8 | 7 | 15 | 110.798 | 96.9486 | 207.747 | 18.466 | 16.158 | 34.624 |
| 20 | JALNA | 12 | 1169 | 8 | 7 | 15 | 49.01 | 12.58 | 61.59 | 8.168 | 2.096 | 10.265 |
| 21 | BEED | 1 | 35 | 9 | 6 | 15 | 1.89 | 1.26 | 3.15 | 0.315 | 0.21 | 0.525 |
| 22 | NANDED | 0 | 0 | 9 | 6 | 15 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 23 | PARBHANI | 1 | 21 | 9 | 6 | 15 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 24 | HINGOLI | 0 | 0 | 9 | 6 | 15 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 25 | LATUR | 95 | 6317 | 8 | 7 | 15 | 222.231 | 202.797 | 425.027 | 37.0384 | 33.7994 | 70.837 |
| 26 | OSMANBAD | 14 | 1456 | 9 | 6 | 15 | 64.471 | 42.981 | 107.452 | 10.745 | 7.163 | 17.908 |
| 27 | AMRAVATI | 30 | 7788 | 8 | 7 | 15 | 174.421 | 268.219 | 442.64 | 29.07 | 44.7 | 73.773 |
| 28 | AKOLA | 3 | 196 | 9 | 6 | 15 | 10.584 | 0 | 10.584 | 1.764 | 0 | 1.764 |
| 29 | WASHIM | 55 | 4444 | 8 | 7 | 15 | 174.916 | 78.1501 | 253.066 | 29.1526 | 13.025 | 42.177 |
| 30 | BULDHANA | 10 | 1219 | 8 | 7 | 15 | 47.979 | 41.982 | 89.961 | 7.996 | 6.997 | 14.993 |
| 31 | YAVATMAL | 30 | 2903 | 8 | 7 | 15 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 32 | NAGPUR DSO | 10 | 497 | 8 | 7 | 15 | 21.56 | 19.11 | 40.67 | 3.593 | 3.185 | 6.778 |
| 33 | NAGPUR FDO | 9 | 4854 | 7.5 | 7.5 | 15 | 179.113 | 176.844 | 355.957 | 29.552 | 29.474 | 59.326 |
| 34 | WARDHA | 13 | 799 | 8 | 7 | 15 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 35 | BHANDARA | 24 | 1370 | 6 | 9 | 15 | 0 | 66.66 | 66.66 | 0 | 11.11 | 11.11 |
| 36 | GONDIA | 13 | 1085 | 6 | 9 | 15 | 39.06 | 56 | 95.06 | 6.51 | 9.33 | 15.84 |
| 37 | CHANDRAPUR | 31 | 5416 | 7 | 8 | 15 | 186.527 | 213.174 | 399.701 | 31.0878 | 35.529 | 66.616 |
| 38 | GADCHIROLI | 9 | 308 | 6 | 9 | 15 | 0 | 16.63 | 16.63 | 0 | 2.771 | 2.771 |
| | TOTAL | 679 | 97609 | 311 | 259 | 570 | 2995.67 | 2746 | 5741.67 | 498.971 | 457.654 | 956.625 |

विवरणपत्र- ब

| DISTRICTS | NO OF GOVERNMENT INSTIUTIONS | NO OF BENEFICIARIES | QUANTUM PER BENEFICIARY PER MONTH (KG) | | | REQUIREMENT OF DISTRICT FOR 6 MONTH | | | BALANCE AS PER UC OF PERIOD OCT 2018 TO MARCH 2019 | | | ACTUAL REQUIREMENT | | | ALLOCATION FOR THE PERIOD | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| MUMBAI /THANE | 32 | 15014 | 8 | 7 | 15 | 720.672 | 630.588 | 1351.26 | 0 | 0 | 0 | 720.672 | 630.588 | 1351.26 | 595.5 | 517.0822 | 1112.582 |
| THANE * | 0 | 0 | 9 | 6 | 15 | 0 | 0 | 0 | 41.777 | 0 | 41.777 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| PALGHAR | 9 | 900 | 7 | 8 | 15 | 37.8 | 43.2 | 81 | 0 | 0 | 0 | 37.8 | 43.2 | 81 | 33.996 | 38.424 | 72.42 |
| RAIGAD | 23 | 6549 | 7.5 | 7.5 | 15 | 294.705 | 294.705 | 589.41 | 0 | 0 | 0 | 294.705 | 294.705 | 589.41 | 241.6581 | 241.6581 | 483.3162 |
| RATNAGIRI * | 6 | 632 | 7 | 8 | 15 | 26.544 | 30.336 | 56.88 | 146.444 | 215.95 | 362.39 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| SINDHUDURG | 6 | 280 | 7 | 8 | 15 | 11.76 | 13.44 | 25.2 | 4.963 | 4.364 | 9.327 | 6.797 | 9.076 | 15.873 | 5.57354 | 7.44232 | 13.01586 |
| NASIK | 8 | 3745 | 9 | 6 | 15 | 202.23 | 134.82 | 337.05 | 33.11 | 0 | 33.11 | 169.12 | 134.82 | 303.94 | 138.6784 | 110.5524 | 249.2308 |
| DHULE | 10 | 293 | 9 | 6 | 15 | 15.822 | 10.548 | 26.37 | 0 | 0 | 0 | 15.822 | 10.548 | 26.37 | 12.97404 | 8.64936 | 21.6234 |
| NANDURBAR * | 16 | 3456 | 9 | 6 | 15 | 186.624 | 124.416 | 311.04 | 325.67 | 100.62 | 426.29 | 0 | 23.796 | 23.796 | 0 | 21.51 | 21.51 |
| JALGAON* | 16 | 1140 | 9 | 6 | 15 | 61.56 | 41.04 | 102.6 | 235.36 | 0 | 235.36 | 0 | 41.04 | 41.04 | 0 | 33.6528 | 33.6528 |
| AHMEDNAGAR* | 26 | 999 | 9 | 6 | 15 | 53.946 | 35.964 | 89.91 | 36.323 | 88.949 | 125.272 | 17.623 | 0 | 17.623 | 17.623 | 0 | 17.623 |
| PUNE DSO* | 24 | 1746 | 10 | 5 | 15 | 104.76 | 52.38 | 157.14 | 200.269 | 42.402 | 242.671 | 0 | 9.978 | 9.978 | 0 | 8.18196 | 8.18196 |
| PUNE FDO | 7 | 7095 | 8 | 7 | 15 | 340.56 | 297.99 | 638.55 | 0 | 0 | 0 | 340.56 | 297.99 | 638.55 | 279.2592 | 244.3518 | 523.611 |
| SATARA * | 35 | 2442 | 9 | 6 | 15 | 131.868 | 87.912 | 219.78 | 112.941 | 118.024 | 230.965 | 18.927 | 0 | 18.927 | 15.52014 | 0 | 15.52014 |
| SANGALI | 65 | 5353 | 9 | 6 | 15 | 289.062 | 192.708 | 481.77 | 0 | 52.156 | 52.156 | 289.062 | 140.552 | 429.614 | 237.0308 | 115.2526 | 352.2835 |
| SOLAPUR DSO | 25 | 1965 | 9 | 6 | 15 | 106.11 | 70.74 | 176.85 | 62.26 | 0.85 | 63.11 | 43.85 | 69.89 | 113.74 | 35.957 | 57.3098 | 93.2668 |
| SOLAPUR FDO | 4 | 1248 | 8 | 7 | 15 | 59.904 | 52.416 | 112.32 | 0 | 12.39 | 12.39 | 59.904 | 40.026 | 99.93 | 49.12128 | 32.82132 | 81.9426 |
| KOLHAPUR | 2 | 2060 | 9 | 6 | 15 | 111.24 | 74.16 | 185.4 | 50 | 54.92 | 104.92 | 61.24 | 19.24 | 80.48 | 50.2168 | 15.7768 | 65.9936 |
| AURANGABAD | 5 | 2815 | 8 | 7 | 15 | 135.12 | 118.23 | 253.35 | 0 | 0 | 0 | 135.12 | 118.23 | 253.35 | 110.7984 | 96.9486 | 207.747 |
| JALNA | 12 | 1169 | 8 | 7 | 15 | 56.112 | 49.098 | 105.21 | 0 | 34.969 | 34.969 | 56.112 | 14.129 | 70.241 | 49.01 | 12.58 | 61.59 |
| BEED | 1 | 35 | 9 | 6 | 15 | 1.89 | 1.26 | 3.15 | 0 | 0 | 0 | 1.89 | 1.26 | 3.15 | 1.89 | 1.26 | 3.15 |
| NANDED* | 0 | 0 | 9 | 6 | 15 | 0 | 0 | 0 | 328.959 | 224.752 | 553.711 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| PARBHANI* | 1 | 21 | 9 | 6 | 15 | 1.134 | 0.756 | 1.89 | 121.846 | 126.963 | 248.809 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| HINGOLI* | 0 | 0 | 9 | 6 | 15 | 0 | 0 | 0 | 44.691 | 60.969 | 105.66 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| LATUR | 95 | 6317 | 8 | 7 | 15 | 303.216 | 265.314 | 568.53 | 32.203 | 18.001 | 50.204 | 271.013 | 247.313 | 518.326 | 222.2307 | 202.7967 | 425.0273 |
| OSMANBAD | 14 | 1456 | 9 | 6 | 15 | 78.624 | 52.416 | 131.04 | 0 | 0 | 0 | 78.624 | 52.416 | 131.04 | 64.47168 | 42.98112 | 107.4528 |
| AMRAVATI | 30 | 7788 | 8 | 7 | 15 | 373.824 | 327.096 | 700.92 | 161.115 | 0 | 161.115 | 212.709 | 327.096 | 539.805 | 174.4214 | 268.2187 | 442.6401 |
| AKOLA* | 3 | 196 | 9 | 6 | 15 | 10.584 | 7.056 | 17.64 | 0 | 144.983 | 144.983 | 10.584 | 0 | 10.584 | 10.584 | 0 | 10.584 |
| WASHIM | 55 | 4444 | 8 | 7 | 15 | 213.312 | 186.648 | 399.96 | 0 | 91.343 | 91.343 | 213.312 | 95.305 | 308.617 | 174.9158 | 78.1501 | 253.0659 |
| BULDHANA | 10 | 1219 | 8 | 7 | 15 | 58.512 | 51.198 | 109.71 | 0 | 0 | 0 | 58.512 | 51.198 | 109.71 | 47.97984 | 41.98236 | 89.9622 |
| YAVATMAL* | 30 | 2903 | 8 | 7 | 15 | 139.344 | 121.926 | 261.27 | 254.357 | 182.114 | 436.471 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| NAGPUR DSO | 10 | 497 | 8 | 7 | 15 | 23.856 | 20.874 | 44.73 | 0 | 0 | 0 | 23.856 | 20.874 | 44.73 | 21.56 | 19.11 | 40.67 |
| NAGPUR FDO | 9 | 4854 | 7.5 | 7.5 | 15 | 218.43 | 218.43 | 436.86 | 0 | 2.766 | 2.766 | 218.43 | 215.664 | 434.094 | 179.1126 | 176.8445 | 355.9571 |
| WARDHA* | 13 | 799 | 8 | 7 | 15 | 38.352 | 33.558 | 71.91 | 65.124 | 80.025 | 145.149 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| BHANDARA* | 24 | 1370 | 6 | 9 | 15 | 49.32 | 73.98 | 123.3 | 93.556 | 0 | 93.556 | 0 | 73.98 | 73.98 | 0 | 66.66 | 66.66 |
| GONDIA | 13 | 1085 | 6 | 9 | 15 | 39.06 | 58.59 | 97.65 | 0 | 0 | 0 | 39.06 | 58.59 | 97.65 | 39.06 | 56 | 95.06 |
| CHANDRAPUR | 31 | 5416 | 7 | 8 | 15 | 227.472 | 259.968 | 487.44 | 0 | 0 | 0 | 227.472 | 259.968 | 487.44 | 186.527 | 213.1738 | 399.7008 |
| GADCHIROLI* | 9 | 308 | 6 | 9 | 15 | 11.088 | 16.632 | 27.72 | 356.545 | 0 | 356.545 | 0 | 16.632 | 16.632 | 0 | 16.63 | 16.63 |
| TOTAL | 679 | 97609 | 311 | 259 | 570 | 5274.16 | 151684 | 8784.81 | 2707.51 | 1657.51 | 4365.02 | 3622.78 | 3318.1 | 6940.88 | 2995.67 | 2746.001 | 5741.671 |

* ठाणे नांदेड व हिंगोली या जिल्हयामध्ये शासकीय संस्था नसल्याने सदर जिल्हयांना नियतनाचे वाटप करण्यात आलेले नाही. रत्नागिरी,परभणी,यवतमाळ,वर्धा या चार जिल्हयांकडे पुर्वीचे नियतन शिल्लक असल्याने त्या जिल्हयांना अन्नधान्याचे वाटप करण्यात आलेले नाही.नंदूरबार,जळगाव,पुणे ग्रामीण,भंडारा,चंद्रपूर या जिल्हयांकडे आवश्यक असणाऱ्या गहू पेक्षा अधिक गहू शिल्लक आहे म्हणुन या जिल्हांना कल्याणकारी संस्थांच्या योजनेतुन गव्हांचे वाटप करण्यात आले नाही.अहमदनगर,सातारा,अकोला या जिल्हांकडे आवश्यतेपेक्षा तांदूळ जास्त असल्याने या जिल्हांना तांदूळाचे वाटप करण्यात आलेले नाही.